



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

आजचा रंग **निळा**

www.surajyadigital.com | बुधवार, दि.२८ सप्टेंबर २०२२ | वर्ष : २० वे | अंक : ३५९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


# शिवसेना कोणाची? ठरवण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची

✔ सुराज्य/सोलापूर

**धनुष्यबाण कोणाचा..? शिवसेना कुणाची..? या प्रश्नांचे उत्तर काय मिळणार? हे पाहण्यासाठी संपूर्ण देशाचे लक्ष सर्वोच्च न्यायालयाकडे लागले होते. शेवटी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाने यावर भाष्य करत हा अधिकार निवडणूक आयोगाचा आहे, त्यात न्यायालयाला हस्तक्षेप करता येणार नाही, शिवसेना कोणाची? धनुष्यबाण कोणाचा? हे ठरवण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगाची आहे. निवडणूक आयोगानेच यावर निर्णय घ्यावा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिले. मात्र या निकालानंतर ठाकरे गटाला धक्का आणि शिंदे गटाचा विजय पक्का अशा चर्चांना उधाण आले आहे.**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील पाच न्यायमूर्तींच्या पूर्णपीठाने हा निर्णय दिला. शिवसेनेतील बंडानंतर आमचीच शिवसेना खरी असा दावा करत शिवसेनेचे निवडणूक चिन्ह धनुष्यबाण हे आपल्याच गटाला मिळावे, असा दावा एकनाथ शिंदे गटाने निवडणूक आयोगाकडे केला होता. त्यास ठाकरे गटाने विरोध करून हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात आणला होता. निवडणूक आयोगाला धनुष्यबाणाबाबतचा निर्णय घेण्यापासून रोखण्याची मागणी ठाकरे गटाने केली होती. त्यावर सुरुवातीला न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली होती. मात्र मंगळवारी घटनापीठाने ही स्थगिती उठवत निवडणूक चिन्हाबाबत निर्णय घेण्यास निवडणूक आयोगाला मोकळीक देऊन टाकली.




## शिंदे गटच मूळ शिवसेना

आम्ही शिवसेना पक्ष सोडला नसून आमचा गट हाच मूळ पक्ष आहे, असा दावा करत एकनाथ शिंदे यांनी निवडणूक आयोगाकडे अर्ज केला होता आणि पक्षाचे चिन्ह मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. याबाबत कोर्टाने शिंदे हे कोणत्या भूमिकेतून निवडणूक आयोगाकडे गेले होते? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर शिंदे यांच्याकडून निरज किशन कौल यांनी उत्तर देत पक्षाचा सदस्य म्हणून आम्हाला आयोगाकडे जाण्याचा अधिकार आहे, असा युक्तिवाद केला.

## उध्दव ठाकरे हेच पक्ष प्रमुख

निवडणूक आयोगाकडील कागदपत्रांनुसार उद्धव ठाकरे हेच २०१८ ते २०२३ या कालावधीपर्यंत शिवसेनेचे अध्यक्ष आहेत. एकनाथ शिंदे यांनी स्वेच्छेने पक्ष सदस्यत्व सोडले आहे, एकनाथ शिंदे हे पक्षाचे प्राथमिक सदस्यही नव्हते. ते पक्षाच्या कार्यकारिणीत निवडून आलेले नव्हे तर नियुक्त केलेले होते, असा युक्तिवाद ठाकरे गटाकडून ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी केला.

## निर्णयाचे विश्लेषण



सत्तेचे विकेंद्रीकरण करत आपल्या राज्यघटनेने सुप्रीम कोर्ट, राज्यपाल, निवडणूक आयोग यांना विविध अधिकार दिले आहेत. त्यामुळे एखाद्या पक्षाची नोंदणी करून घेणे, त्याला मान्यता देणे हे निवडणूक आयोगाचे काम आहे. त्याचप्रमाणे राजकीय पक्षाच्या चिन्हाबाबत निर्णय घेण्याचा अधिकारही आयोगाकडे आहे. आमदारांच्या अपात्रतेबाबत निर्णय आधी होणार की पक्षाच्या चिन्हावर आधी निर्णय होणार, असा आता प्रश्न होता. अपात्रतेविषयी निर्णय झाल्याशिवाय निवडणूक आयोगाने पक्ष चिन्हाबाबत निर्णय घेऊ नये, अशा सूचना कराव्यात, अशी मागणी ठाकरे गटाकडून सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली होती. मात्र ती घटनापीठाने मान्य केलेली नाही. नेमका कोणाचा पक्ष खरा आहे हे ठरवण्याचे आणि चिन्हाचा निर्णय घेण्याचे काम निवडणूक आयोगाचे आहे, असे सांगत कोर्टाने आयोगाच्या कार्यवाहीला स्थगिती न देण्याचा निर्णय घेतला आहे. यानंतर निवडणूक आयोगाने काहीही निर्णय दिला तरी पुन्हा त्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाता येते. त्यामुळे या निर्णयाने सगळे काही संपलेय, असेही नाही. हा खटला आजच्या निर्णयाने फक्त एक-दोन इंच पुढे गेला आहे,' असे विश्लेषण ज्येष्ठ घटनातज्ञ डॉ. उल्हास बापट यांनी केले आहे.

# नारायण राणेंचा दौरा रद्द; इतर नेत्यांच्या दौऱ्यावरही प्रश्नचिन्ह

**विमानाच्या लॅंडींगमध्ये अडथळा असल्याचा निरोप**

✔ **सोलापूर** : भाजप नेते, केंद्रीय लघू उद्योगमंत्री नारायण राणे यांचा मंगळवारचा सोलापूर दौरा अचानक रद्द झाला. सोलापुरातील होटगी रोडवर विमानतळावर विमानाचे लॅंडींग करण्यात अडथळा असल्याचा निरोप राणे यांच्या सुरक्षा यंत्रणेकडे पोहोचल्यामुळेच हा दौरा रद्द करावा लागला आहे. त्यामुळे आता आगामी काळात होणाऱ्या नेत्यांच्या दौऱ्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



नवरात्रोत्सवानिमित्त तुळजाभवानी मातेचे दर्शन घेण्यासाठी ना. नारायण राणे दरवर्षी सोलापूरमार्गे तुळजापूरला जात असतात. यावर्षीही त्यांचा हा कार्यक्रम ठरला होता. याशिवाय त्यांनी सोलापुरातील कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेण्याचा कार्यक्रम ठरवला होता. त्यासाठी ते केंद्रीय मंत्री नारायण राणे मंगळवारी सोलापुरात येणार होते. सोलापूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना निरोपही मिळाले होते. जिल्हा प्रशासनाने या दौऱ्याची तयारी केली होती. दरम्यान, नागरी विमान वाहतूक महासंचालकांनी होटगी रोड विमानतळावर विमान उतरण्यास सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याच्या चिमणीसह विविध अडथळे असल्याचा अहवाल दिला आहे. या अहवालामुळे एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाने विमानसेवा सुरू करण्यास असमर्थता दर्शविली आहे. होटगी रोड विमानतळाच्या रनवे ३३ वर विमाने उतरविणे धोक्याचे असल्याचा या दोनही सरकारी संस्थांचे म्हणणे आहे. हाच विषय सोलापुरातील काही लोकांनी नारायण राणे यांच्या कार्यालयापर्यंत पोहोचविला. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांनी एअरपोर्ट ॲथॉरिटीकडून माहिती जाणून घेतली. एअरपोर्ट ॲथॉरिटीच्या निरोपानंतर दौरा रद्द झाला. दरम्यान, माजी उपमहापौर राजेश काळे यांनी राणे यांच्या स्वागतासाठी जंगी तयारी केली होती. मात्र दौरा अचानक रद्द झाल्याने त्यांची निराशा झाली.



## सुरक्षिततेच्या कारणावरून दौरा रद्द : आ.नितेश राणे

दरवर्षीप्रमाणे नारायण राणे साहेब तुळजापूरला जाण्यासाठी सोलापुरात येणार होतो. मात्र डीजीसीएने सोलापूर विमानतळाची धावपट्टी लॅंडीगसाठी सुरक्षित नाही असे कळवले. केंद्रीय मंत्री येणार होते, म्हणून त्यांनी सुरक्षिततेची काळजी घेतली आणि आम्हाला कळवले. त्यामुळे राणे साहेबांचा दौरा आम्ही रद्द केला असे त्यांचे त्यांचे पुत्र आ. नितेश राणे यांनी सुराज्यशी बोलताना सांगितले.

# सोलापुरातील पीएफआयच्या कार्यकर्त्यावर केली एनआयएने प्रतिबंधक कारवाई

**• ६ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी**

✔ **सोलापूर** : नवरात्रीच्या सणांमध्ये काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून एनआयए आणि एटीएसच्या माध्यमातून राज्यभर छापेमारी करण्यात आली असून सोलापुरात देखील मंगळवारी छापेमारी करण्यात आली. पीएफआय या संघटनेशी संबंधित असलेल्या एका चाळीस वर्षीय इसमाला शहरातील सहारा नगर परिसरातून एनआयएने शहर पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले.


आसिफ शौकत शेख (वय-४०, रा.प्लॉट नं.२४, सहारा नगर भाग २, सोलापूर) असे ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव आहे. त्याला सोलापूर न्यायालयासमोर उभे केले असता ६ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेचे प्रतिनिधी व कार्यकर्ते एनआयए, एटीएस व पोलिसांकडून ताब्यात घेतले जात आहेत. सोलापूर शहरात पीएफआयकडून नूपुर शर्मा प्रकरण, हिजाब प्रकरण, शाहीनबाग प्रकरण, रोंहिग्या मुस्लीम प्रकरण चालू असताना आंदोलने करण्यात आली होती. त्यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला होता. तसेच पुणे येथे पीएफआय कार्यकर्त्यावर झालेल्या कारवाईच्या अनुषंगाने घोषणाबाजी केल्याने जातीय तणाव निर्माण झाला होता.

सोलापूर शहरातही पीएफआयचे सक्रिय कार्यकर्ते असल्याची माहिती मिळाल्याने तपास यंत्रणांकडूनही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले. पुणे येथे झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातदेखील तशाच स्वरूपाचे आंदोलन नवरात्रोत्सवामध्ये करण्याची दाट शक्यता असून त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊन जातीय तणाव निर्माण होण्याची शक्यता असल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली होती. सोलापूर शहरातील नई जिंदगी परिसरात या संघटनेचा सक्रिय कार्यकर्ता असिफ शेख राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार राष्ट्रीय तपास यंत्रणा व सोलापूर शहर पोलिसांनी मंगळवारी पहाटे कारवाई करीत त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. विजापूर नाका पोलीस ठाण्यात आणून त्याची कसून चौकशी करण्यात आली. त्यानंतर त्याला प्रतिबंधात्मक कारवाईसाठी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला ६ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अशावेळी आपण सावध असावं लागतं!!

| कल्याण |
| --- |
| 579-13-247 |

| मेन बाजार |
| --- |
| 557-74-356 |


|| विनम्र अभिवादन ||



स्व.राजेश (अण्णा) विष्णुपंत कोठे

* संस्थापक *

आठविता सहवास आपला पापणी ओलावली,
विनम्र होऊन आम्ही अर्पितो आज ही श्रद्धांजली...

सुराज्य सोलापूर परिवार